नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३२७ Issue - 327 | वार शनिवार दि. १८ एप्रिल २०२६ Blow- Saturday Date 18 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# महिला आरक्षण विधेयक नामंजूर

## विधेयकाच्या बाजूनं २९८ तर विरोधात २३० मतं, केंद्र सरकारला धक्का, इतर दोन विधेयके सरकारकडून मागे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारनं संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयक, २०२६, केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक, २०२६ आणि सीमांकन विधेयक, २०२६ लोकसभेत सादर केली होती. या विधेयकांच्या बाजूनं पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह सत्ताधारी पक्षातील विविध नेत्यांनी भूमिका मांडली. तर, विरोधी पक्षांकडून अखिलेश यादव, प्रियांका गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, अरविंद सावंत, अमोल कोल्हे, वर्षा गायकवाड, कल्याण बॅनर्जी यांच्यासह विरोधी पक्षांनी बाजू मांडली. हे घटनादुरुस्ती विधेयक असल्यानं मंजूर करण्यासाठी लोकसभेतील उपस्थित सदस्यांच्या दोन तृतियांश मते आवश्यक असतात. लोकसभेत या घटनादुरुस्ती विधेयकावर मतविभाजनाद्वारे मतदान घेण्यात आलं. घटनादुरुस्तीच्या बाजूनं पहिल्या फेरीत २९८ मतदान झालं, तर घटनादुरुस्ती विधेयकाच्या विरोधात



२३० मतं नोंदवली गेली आहेत. एकूण ५२८ खासदारांनी मतदानं केलं, आता राज्यसभेत उद्या मतदान होणार आहे. ५२८ चं दोन तृतियांश ३५२ होतं त्यामुळं घटनादुरुस्ती विधेयक मंजुरीसाठी आवश्यक संख्याबळ सरकारकडे नसल्याचं स्पष्ट झालं. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयक, २०२६ नामंजूर झाल्याचं जाहीर केलं. यानंतर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी इतर दोन विधेयकं पुढं न नेण्याचा निर्णय घेतला आहे.

सत्ताधाऱ्यांचा २०२९ पासून महिला आरक्षण लागू करण्याचा प्रयत्न

केंद्र सरकारकडून महिला आरक्षण लोकसभेत आणि विधानसभेत संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयकात लोकसभेच्या जागा वाढवण्याचं प्रस्तावित केलं आहे. २०२९ च्या निवडणुकीत लोकसभेच्या सध्याच्या ५४३ जागांमध्ये वाढ करुन राज्यातील लोकसभेच्या जागा ८१५ आणि केंद्रशासित प्रदेशांच्या जागा ३५ जागा मिळून ८५० जागा करण्याचा प्रस्ताव विधेयकात होता. सरकारचा महिला आरक्षणातील दुरुस्ती विधेयकासोबत लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेचं विधेयक मांडलं होतं. विरोधी पक्षांकडून नेमका याच मुद्याला आक्षेप होता.

अमित शाह यांनी विरोधी पक्षांवर टीका करताना म्हटलं की २०२३ मध्ये विरोधी पक्ष महिलांना आरक्षण देण्याचा शब्द दिलं होतं आता द्यायचा विषय आलेला असताना मागं हटत आहेत. महिला आरक्षण लटकवत आहात, तुम्ही निवडणुकीत जिथं जिथं जात असाल तिथं तुम्हाला या देशातील महिलांचा आक्रोश सहन करावा लागेल, असं अमित शाह म्हणाले.

विरोधी पक्षांकडून महिला आरक्षण विधेयक २०२३ मध्ये मंजूर करण्यात आल्याची भूमिका मांडण्यात आली. केंद्र सरकारचा महिला आरक्षण विधेयकासोबत परिसीमन विधेयक आणल्यानं विरोधी पक्षांनी सरकारच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी सरकारनं आणलेल्या विधेयकावर बोलताना यापूर्वी महिला आरक्षण विधेयकाला सध्याच्या सत्ताधाऱ्यांनी विरोध केल्याचं म्हटलं होतं. केंद्र सरकारला महिला आरक्षण लोकसभा आणि विधानसभेत लागू करायचं असेल तर ५४३ जागांमध्येच अंमलबजावणी करावी, अशी भूमिका प्रियांका गांधी यांनी मांडली. केंद्र सरकारचा लोकसभेची सदस्यसंख्या ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रयत्न वरवर पाहता यात आपत्ती वाटत नाही मात्र सखोलपणे विचार केल्यास यातील राजकीय हेतू लक्षात येतो, असं प्रियांका गांधी म्हणाल्या होत्या.

घटनादुरुस्ती विधेयक असल्यानं लोकसभेत याला मंजूर करण्यासाठी दोन तृतियांश मतं आवश्यक आहेत. म्हणजेच लोकसभेत सध्या ५४० खासदार असल्यानं त्यापैकी ३६० खासदारांची मतं घटनादुरुस्ती विधेयकासाठी आवश्यक आहेत.

# खासगी ट्रॅव्हल्स अन् कारचा भीषण अपघात; ६ प्रवाशांचा होरपळून मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर : समृद्धी महामार्गावर भीषण अपघात होऊन अशोक खरातचे निकटवर्तीय आणि शिवनिका संस्थेचे उपाध्यक्ष जितेंद्र शेळके आणि त्यांचा पत्नीचा मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली. समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघाताची घटना ताजी असतानाच, कर्नाटकातील यादगीर जिल्ह्यात खासगी ट्रॅव्हल्स आणि कारचा भीषण अपघात झाला. खासगी आराम बस आणि कार एकमेकांवर आदळल्याने लागलेल्या आगीत सहा प्रवासी होरपळून मृत्यूमुखी पडले. यादगीर जिल्ह्यातील सुरपूर तालुक्यातील शांतगिरी क्रॉस येथे हा अपघात घडला. या घटनेनंतर स्थानिकांनी लगेचच घटनास्थळी धाव घेतली. मात्र, प्रवाशांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

खासगी आरामदायी बस बंगळुरुहून कलबुर्गीला निघाली होती, तर कार विरुद्ध दिशेने येत होती. भरधाव कार खासगी आराम बसला येऊन धडकली असता बसने लगेच पेट घेतला. या भीषण दुर्घटनेत बसने पेट घेतल्यानंतर बसमधील प्रवाशांनी जीव वाचवण्यासाठी हाताला मिळेल ते आपले सामान घेऊन बसमधून बाहेर पडण्याची धडपड केली. मात्र, बसमधील सहा प्रवाशांचा आगीत होरपळून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. तर, इतर प्रवाशांना आपला जीव वाचविण्यात यश मिळाले. या दुर्घटनेत अनेक प्रवासी देखील जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी हॉस्पिटलला हलविण्यात आले आहे.

बस आणि कार यांच्यातील अपघात आणि आगीचे वृत्त कळताच अग्निशमक दल पाण्याच्या गाडीसह घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी आग विझवली. पण, तोपर्यंत बस आगीत जळून खास झाली होती. अपघातात होरपळून मृत्यूमुखी पडलेले सहा जण एकाच कुटुंबातील असून ते देव दर्शनावरून परत येत होते. कार ओव्हरटेक करताना हा अपघात घडल्याचे यादगीर एस.पी. पृथ्वीक शंकर यांनी सांगितले.

# अशोक खरात यांचे निकटवर्तीयाचा ट्रकखाली चिरडून मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



छत्रपती संभाजीनगर : समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच असून, शुक्रवारी झालेल्या एका भीषण अपघातात शिवनिका ट्रस्टचे माजी उपाध्यक्ष आणि उद्योजक जितेंद्र शेळके यांचा दुर्दैवी अंत झाला. संभाजीनगरहून शिर्डीच्या दिशेने प्रवास करत असताना धोत्रे गावाजवळ हा थरार घडला. उभ्या असलेल्या एका कंटेनरला शेळके यांच्या कारने पाठीमागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, कार थेट कंटेनरच्या खालच्या भागात घुसली, ज्यामध्ये शेळके यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात केवळ जितेंद्र शेळके यांचाच नव्हे, तर त्यांच्या संपूर्ण कुटुंबाला गंभीर दुखापत झाली आहे. अपघाताच्या वेळी त्यांच्यासोबत असलेल्या त्यांच्या मुलाला तातडीने बाहेर काढून रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, अपघातानंतर शेळके यांच्या पत्नी बराच वेळ कारच्या ढिगाऱ्यात अडकून पडल्या होत्या. त्यांना बाहेर काढण्यासाठी प्रशासनाकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. जितेंद्र शेळके हे वादग्रस्त ठरलेले 'शिवनिका ट्रस्ट'चे सर्वेसर्वा अशोक खरात यांचे अत्यंत विश्वासू आणि निकटवर्तीय मानले जात होते. ट्रस्टमध्ये उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळण्यासोबतच, खरात यांच्या लॉन्स व्यवसायातही शेळके यांची मोठी भागीदारी होती. सूत्रांच्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून अशोक खरात यांना झालेल्या अटकेमुळे जितेंद्र शेळके हे प्रचंड मानसिक तणावाखाली होते.

# संविधानावरील हल्ला, संविधानावरील आक्रमण पराभूत केले

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारनं संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयक, २०२६, केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक, २०२६ आणि सीमांकन विधेयक, २०२६ लोकसभेत सादर केली होती. लोकसभेत या घटनादुरुस्ती विधेयकावर मतविभाजनाद्वारे मतदान घेण्यात आलं. घटनादुरुस्तीच्या बाजूनं पहिल्या फेरीत २९८ मतदान झालं, तर घटनादुरुस्ती विधेयकाच्या विरोधात २३० मतं नोंदवली गेली आहेत. दोन तृतियांश खासदारांनी महिला आरक्षण कायद्यातील घटनादुरुस्ती विधेयकाच्या बाजूनं मतदान न केल्यानं हे विधेयक कोसळलं. याबाबत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी भूमिका मांडली आहे. राहुल गांधी यांनी संविधानावरील हल्ला, संविधानावरील आक्रमण पराभूत केल्याचं म्हटलं.

### महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक नामंजूर होताच राहुल गांधी यांची प्रतिक्रिया

हा संविधानावर हल्ला होता, संविधानावर आक्रमण होतं, आम्ही त्याला पराभूत केलं आहे. आम्ही स्पष्टपणे सांगितलं की हे महिला आरक्षण विधेयक नव्हतं, ही भारताच्या निवडणुकीची संरचना बदलण्याचा प्रयत्न होता तो आम्ही राखला आहे. मला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सांगायचं आहे, तुम्हाला महिला आरक्षण लागू करायचं असेल तर २०२३ चं महिला आरक्षण आजपासून लागू करा. पूर्ण विरोधी पक्ष तुम्हाला पाठिंबा देतील. महिला आरक्षण विधेयक आजपासून लागू करा, असं राहुल गांधी यांनी म्हटलं.





लोकसभेत महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक नामंजूर झाल्यानंतर राहुल गांधी यांनी एक्स प्लॅटफॉर्मवर पोस्ट केली आहे. राहुल गांधी म्हणाले की घटनादुरुस्ती विधेयक कोसळलं आहे. ते असंविधानिक पद्धतीनं महिलांच्या नावाखाली संविधान मोडण्याचा प्रयत्न करत होते. भारतानं पाहिलं इंडिया आघाडीनं ते थांबवलं, संविधानाचा विजय असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. महिला आरक्षणाचा विषय नव्हता हा देशाच्या लोकशाहीचा विषय होता, हा देशाच्या अखंडतेचा विषय होता. महिला आरक्षणाला डीलिमिटेशनसोबत जोडल्यानं हे शक्य नव्हतं. आपल्या देशाच्या लोकशाहीसाठी आणि देशाच्या अखंडतेसाठी हा मोठा विजय आहे. महिला विरोधी मानसिकता जे लोक सांगत आहेत, ज्यांनी हाथरसमध्ये काही केलं नाही. ज्यांनी उन्नावमध्ये काही केलं नाही, मणिपूरच्या महिलांसाठी काही केलं नाही, खेळाडू महिलांसाठी काही केलं नाही त्यांनी आम्हाला महिला विरोधी मानसिकता आहे असं म्हणावं का असा सवाल प्रियांका गांधी यांनी केला.

हा विषय आनंदाचा किंवा विजयाचा मुद्दा नाही, मूळ मुद्दा हा आहे की तुम्ही लबाडी करत आहात. तुमचं महिला आरक्षणाचं हे विधेयक नव्हतं, हे ठाम मत आहे. तुम्ही सभागृहात सांगत होता तुमची संख्या वाढणार पण बिलात कुठं उल्लेख आहे. प्रत्येक राज्याची ५० टक्के संख्या वाढली तर आहे तसं प्रमाण राहील, ते विधेयकात नाही. यात ओबीसी आरक्षण नाही. परिसीमन आयोग हे निश्चित करणार का? त्यांनी सीमा ठरवायच्या असतात, त्यांनी मतदारसंघाची संख्या ठरवायची नसते. हे जे बारकावे बऱ्याच लोकांच्या लक्षात येत नाहीत, (पान २ वर...)

**मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली माहिती**

# अवकाळीचा राज्यातील ६६ हजारांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना फटका; बळीराजाला राज्य सरकारचा दिलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात गेल्या काही दिवसांत झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीसह पायाभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. एकूण ६६ हजार ३१२ शेतकरी या अवकाळी संकटामुळे बाधित झाले असून, बळीराजाला दिलासा देण्यासाठी ५३ कोटी ७३ लाख ७ हजार रुपयांची मदत मंजूर केल्याची माहिती मदतीचा मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली.

शासनाकडून उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार, राज्यातील विविध विभागांतील सुमारे ४९ हजार ५११.७२ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे या अवकाळी पावसामुळे नुकसान झाले आहे. यात प्रामुख्याने अमरावती विभागाला निसर्गाच्या कोपाचा सर्वाधिक फटका बसला असून, बुलढाणा आणि यवतमाळ जिल्ह्यांतील ५१ हजार ७२९ शेतकरी बाधित झाले आहेत. या विभागात तब्बल ४२ हजार ३८८.९७ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले असून, त्यासाठी ४२३७.९७ लाख रुपयांची मदत देण्यात येणार आहे. त्यापाठोपाठ छत्रपती संभाजीनगर विभागात नांदेड, लातूर व बीड जिल्ह्यांमध्ये ८,५१५ शेतकरी बाधित झाले असून, तेथील ३,४९१.०३ हेक्टर क्षेत्रासाठी ४४४.०२ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे.



पश्चिम महाराष्ट्रात पुणे विभागांतर्गत सोलापूर व सातारा जिल्ह्यांमध्ये ४,५६४ शेतकरी बाधित झाले असून, ९६६.२ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. या जिल्ह्यांसाठी ५७७.९३ लाख रुपयांची मदत शासनाने मंजूर केली आहे. विदर्भातील नागपूर विभागात वर्धा आणि गोंदिया जिल्ह्यांत १,५०४ शेतकऱ्यांचे ६६५.५२ हेक्टर क्षेत्रावरील नुकसान झाले असून, त्यासाठी ११३.१५ लाख रुपयांची मदत प्रस्तावित करण्यात आली आहे.

पंचनामे तातडीने पूर्ण करा! : नुकसानग्रस्तांना ही मदत त्वरित मिळावी यासाठी प्रशासकीय यंत्रणेला पंचनामे जलदगतीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मदत वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणि वेग राखण्यावर शासनाचा विशेष भर असून, जिल्हाधिकाऱ्यांनी परिस्थितीचा सतत आढावा घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिल्या आहेत. या निर्णयामुळे पिकांचे नुकसान आणि घरांच्या पडझडीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना व ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा आधार मिळणार आहे. मदतीची रक्कम थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी शासन स्तरावर विशेष लक्ष दिले जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# टाकळीवाडी चे जवान रोहित परशुराम खनिकुडे यांचे जम्मू काश्मीर येथे शहीद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील जवान रोहित परशुराम खनिकुडे वय २७ हे जम्मू काश्मीर येथे कर्तव्यास असताना दिनांक १६/ ४ /२०२६ रोजी रात्री बारा वाजता शहीद झाले.

पहिली ते सातवी पर्यंत शिक्षण श्री कुमार विद्यामंदिर टाकळीवाडी , आठवी ते दहावी श्री सरस्वती हायस्कूल टाकळीवाडी येथे झाले.

पुढील शिक्षण श्री दत्त कनिष्ठ महाविद्यालय कुरुंदवाड येथे शिक्षण घेऊन सन २०२० मध्ये बेळगाव येथे मराठा लाईफ इन्फंट्री मध्ये भरती झाले.

त्यांचे ट्रेनिंग बेळगाव येथून झाल्यावर त्यांना अरुणाचल प्रदेश, चीन बॉर्डर, व सध्या जम्मू काश्मीर येथे कर्तव्यास असताना त्यांचे निधन झाले.



यांच्या पश्चात आई-वडील,भाऊ, असा परिवार आहे.

पार्थिव रविवारी सकाळी टाकळीवाडी या गावी येणार असून शासकीय कार्यक्रमांमध्ये त्यांना अखेरचा मानवंदना देण्यात येणार आहे.

# समतेचे मार्गदर्शक महात्मा बसवेश्वर

## संपादकीय....

### लोकसभेत गदारोळ

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारनं संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयक, २०२६, केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक, २०२६ आणि सीमांकन विधेयक, २०२६ लोकसभेत सादर केली होती. या विधेयकांच्या बाजूनं पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह सत्ताधारी पक्षातील विविध नेत्यांनी भूमिका मांडली. तर, विरोधी पक्षांकडून अखिलेश यादव, प्रियांका गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, अरविंद सावंत, अमोल कोल्हे, वर्षा गायकवाड, कल्याण बॅनर्जी यांच्यासह विरोधी पक्षांनी बाजू मांडली. हे घटनादुरुस्ती विधेयक असल्यानं मंजूर करण्यासाठी लोकसभेतील उपस्थित सदस्यांच्या दोन तृतियांश मते आवश्यक असतात. लोकसभेत या घटनादुरुस्ती विधेयकावर मतविभाजनाद्वारे मतदान घेण्यात आलं. घटनादुरुस्तीच्या बाजूनं पहिल्या फेरीत २९८ मतदान झालं, तर घटनादुरुस्ती विधेयकाच्या विरोधात २३० मतं नोंदवली गेली आहेत. एकूण ५२८ खासदारांनी मतदानं केलं, आता राज्यसभेत उद्या मतदान होणार आहे. ५२८ चं दोन तृतियांश ३५२ होतं त्यामुळं घटनादुरुस्ती विधेयक मंजुरीसाठी आवश्यक संख्याबळ सरकारकडे नसल्याचं स्पष्ट झालं. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयक, २०२६ नामंजूर झाल्याचं जाहीर केलं. यानंतर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी इतर दोन विधेयकं पुढं न नेण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारकडून महिला आरक्षण लोकसभेत आणि विधानसभेत संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयकात लोकसभेच्या जागा वाढवण्याचं प्रस्तावित केलं आहे. २०२९ च्या निवडणुकीत लोकसभेच्या सध्याच्या ५४३ जागांमध्ये वाढ करुन राज्यातील लोकसभेच्या जागा ८१५ आणि केंद्रशासित प्रदेशांच्या जागा ३५ जागा मिळून ८५० जागा करण्याचा प्रस्ताव विधेयकात होता. सरकारचा महिला आरक्षणातील दुरुस्ती विधेयकासोबत लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेचं विधेयक मांडलं होतं. विरोधी पक्षांकडून नेमका याच मुद्याला आक्षेप होता.

### संविधानावरील हल्ला, संविधानावरील आक्रमण पराभूत केले

(पान १ वरून...) मूळात ही वेळ देखील चुकीची होती. विरोधी पक्षांनी २९ एप्रिल नंतर अधिवेशन घ्यायला सांगितलं होतं. मात्र, त्यांना पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका आहेत, तिथं ढोल बडवायचे आहेत, असं शिवसेनेचे खासदार अरविंद सावंत म्हणाले. महिला आरक्षणाचा कायदा २०२३ ला मंजूर झालेला आहे. त्यामध्ये ओबीसी महिला आहेत त्यांचं काय करणार आहात. राज्यांची खासदार संख्या ५० टक्के वाढेल असं बिलात कुठं लिहिलं आहे, असं अरविंद सावंत म्हणाले.

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय समाजजीवनाच्या इतिहासात सामाजिक परिवर्तनाचे जे दीपस्तंभ उभे राहिले, त्यामध्ये महात्मा बसवेश्वर यांचे स्थान अत्यंत उंच व प्रेरणादायी आहे. बाराव्या शतकातील हा महान समाजसुधारक केवळ धार्मिक क्षेत्रापुरताच मर्यादित न राहता सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्तरांवर परिवर्तन घडवून आणणारा होता. आज साजरी होणारी त्यांची जयंती ही केवळ एक स्मरणदिन नसून त्यांच्या विचारांची पुनर्स्मृती आणि आजच्या समाजात त्यांची प्रासंगिकता अधोरेखित करण्याची संधी आहे. समता, बंधुता, श्रमाचे महत्त्व, स्त्री-पुरुष समानता आणि अंधश्रद्धाविरोध या मूल्यांचा पाया त्यांनी घातला, जो आजच्या आधुनिक लोकशाही भारताच्या मूलभूत तत्त्वांशी सुसंगत आहे.

महात्मा बसवेश्वरांचा जन्म कर्नाटकात झाला. त्यांच्या बालपणापासूनच त्यांच्यातील विचारशीलता, तर्कशक्ती आणि अन्यायाविरुद्धचा विरोध स्पष्ट दिसून येत होता. त्या काळात भारतीय समाजात जातिव्यवस्था अत्यंत कडवट स्वरूपात अस्तित्वात होती. उच्च-नीचतेच्या भेदामुळे समाजात अन्याय, शोषण आणि असमानता वाढत होती. धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या रूढी, परंपरा आणि कर्मकांडांनी सामान्य जनतेचे जीवन अधिकच कठीण केले होते. अशा परिस्थितीत बसवेश्वरांनी सामाजिक क्रांतीचा ध्यास घेतला आणि समाजाला नव्या विचारांची दिशा दिली.

बसवेश्वरांनी श्रम हाच सर्वोच्च धर्म आहे असे मानले. त्यांनी श्रमाला प्रतिष्ठा दिली आणि प्रत्येक व्यक्तीने आपल्या कर्तृत्वावर आधारित जीवन जगावे, असा संदेश दिला. त्यांच्या या विचारामुळे समाजातील काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला सन्मान प्राप्त झाला. त्या काळात श्रमाला कनिष्ठ मानले जात असताना बसवेश्वरांनी श्रमाचे गौरवगान करून सामाजिक समतेचा पाया मजबूत केला. आजच्या काळातही 'डिग्निटी ऑफ लेबर' ही संकल्पना महत्त्वाची मानली जाते, आणि त्याची मुळे बसवेश्वरांच्या विचारांत दिसून येतात.

बसवेश्वरांनी स्थापना केलेल्या संस्थेच्या मंचावर सर्व जाती-धर्मातील लोक एकत्र येऊन सामाजिक, धार्मिक आणि नैतिक विषयांवर चर्चा करत असत. विशेष म्हणजे या मंचावर स्त्रियांनाही समान संधी देण्यात आली होती. त्या काळात स्त्रियांचे स्थान अत्यंत दुय्यम मानले जात असताना बसवेश्वरांनी त्यांना विचार मांडण्याचे स्वातंत्र्य दिले. हे त्यांच्या प्रगतिशील आणि लोकशाही विचारांचे द्योतक आहे. संस्थेमध्ये केवळ धार्मिक चर्चा होत नसून सामाजिक समस्यांवरही उपाय शोधले जात होते, ज्यामुळे समाजात परिवर्तन घडून आले.



बसवेश्वरांनी जातिव्यवस्थेला तीव्र विरोध केला. त्यांनी सांगितले की माणसाची ओळख त्याच्या जन्मावरून नव्हे तर त्याच्या कर्मावरून ठरते. त्यांनी सर्वांना समान मानले आणि समाजात भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या विचारांमुळे अनेकांनी जातीभेदाचा त्याग करून समतेच्या मार्गाचा स्वीकार केला. त्यांनी आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले, जे त्या काळात अत्यंत क्रांतिकारी पाऊल होते. यामुळे समाजात मोठी खळबळ उडाली, परंतु त्यांनी आपल्या विचारांशी तडजोड केली नाही.

स्त्री-पुरुष समानतेबाबत बसवेश्वरांचे विचार अत्यंत प्रगत होते. त्यांनी स्त्रियांना स्वातंत्र्य आणि समान अधिकार देण्यावर भर दिला. त्यांनी स्त्रियांच्या सहभागाला प्रोत्साहन देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले. त्या काळात स्त्रियांना अनेक बंधनांमध्ये ठेवले जात असताना बसवेश्वरांनी त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून मान्यता दिली. त्यांच्या या विचारांमुळे समाजात स्त्रियांच्या स्थानात सकारात्मक बदल घडून आला.

बसवेश्वरांनी अंधश्रद्धा, कर्मकांड आणि बाह्य आडंबर यांचा तीव्र निषेध केला. त्यांनी साधेपणावर भर दिला आणि अंतर्मुख भक्तीची संकल्पना मांडली. त्यांच्या वचनांमधून त्यांनी लोकांना सत्य, नैतिकता आणि साधेपणाचा मार्ग दाखवला. त्यांनी देवाची उपासना ही मनापासून करावी, असे सांगितले आणि बाह्य विधींचा त्याग करण्याचे आवाहन केले. त्यांच्या या विचारांमुळे धर्माचा खरा अर्थ लोकांना समजला.

बसवेश्वरांच्या वचनांमध्ये समाजातील वास्तवाचे चित्रण दिसून येते. त्यांच्या वचनांमध्ये जीवनातील अनुभव, तत्त्वज्ञान आणि सामाजिक संदेश यांचा समन्वय आहे. त्यांनी सोप्या भाषेत आणि प्रभावी शैलीत आपले विचार मांडले, ज्यामुळे ते सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचले. त्यांच्या वचनांमधून त्यांनी समाजातील अन्याय, विषमता आणि अज्ञान यावर प्रहार केला आणि लोकांना जागृत केले.

आजच्या काळात बसवेश्वरांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. आधुनिक भारतात जरी संविधानाने समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांची हमी दिली असली तरी समाजात अजूनही अनेक प्रकारचे भेदभाव आणि अन्याय अस्तित्वात आहेत. जातीयवाद, लिंगभेद, आर्थिक विषमता आणि अंधश्रद्धा यांसारख्या समस्या अजूनही समाजाला ग्रासून आहेत. अशा परिस्थितीत बसवेश्वरांचे विचार समाजाला योग्य दिशा देऊ शकतात.

शिक्षणाच्या क्षेत्रातही बसवेश्वरांचे विचार महत्त्वाचे आहेत. त्यांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे साधन मानले. आजच्या काळात शिक्षणाचा प्रसार झाला असला तरी मूल्याधिष्ठित शिक्षणाची गरज आहे. बसवेश्वरांनी दिलेले नैतिक मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी यांचे शिक्षण आजच्या पिढीला देणे आवश्यक आहे. यामुळे समाजात सकारात्मक बदल घडू शकतो.

आर्थिक क्षेत्रात बसवेश्वरांनी श्रमाच्या आधारे संपत्ती निर्माण करण्यावर भर दिला. त्यांनी परिश्रमाचे महत्त्व अधोरेखित केले आणि परजीवी वृत्तीचा निषेध केला. आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही त्यांच्या या विचारांची उपयुक्तता कमी झालेली नाही. स्वावलंबन, कष्ट आणि प्रामाणिकपणा यांवर आधारित अर्थव्यवस्था समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे.

बसवेश्वरांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित राहिले नाही, तर त्याचा प्रभाव पुढील अनेक शतकांपर्यंत दिसून येतो. त्यांच्या विचारांमुळे समाजात समतेची जाणीव निर्माण झाली आणि सामाजिक न्यायाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. त्यांच्या कार्याने अनेक समाजसुधारकांना प्रेरणा दिली आणि सामाजिक परिवर्तनाची चळवळ पुढे नेली.



आज महात्मा बसवेश्वरांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचे स्मरण करणे आवश्यक आहे. केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता त्यांच्या विचारांचा अंगीकार करणे गरजेचे आहे. समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यांच्या विचारांवर आधारित समाजरचना निर्माण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

समाजात बदल घडवून आणण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात, तर त्यासाठी विचारांमध्ये परिवर्तन आवश्यक असते. बसवेश्वरांनी हेच कार्य केले. त्यांनी लोकांच्या विचारांमध्ये बदल घडवून आणला आणि समाजाला नव्या दिशेने नेले. आजच्या काळातही त्यांच्या विचारांची गरज आहे, कारण सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी मूल्याधिष्ठित दृष्टिकोन आवश्यक आहे.

महात्मा बसवेश्वर हे केवळ एक संत नव्हते, तर ते एक महान समाजशास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ आणि क्रांतिकारक होते. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाचा विचार करून सर्वसमावेशक विकासाचा मार्ग दाखवला. त्यांच्या विचारांमध्ये मानवतावाद, समता आणि न्याय यांचा समन्वय आहे. त्यामुळे त्यांचे विचार आजही तितकेच प्रभावी आणि प्रेरणादायी आहेत.

अखेरीस असे म्हणता येईल की महात्मा बसवेश्वरांचे कार्य आणि विचार हे भारतीय समाजासाठी एक अमूल्य ठेवा आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचा अभ्यास करून त्यांचा अंगीकार केला, तर समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते. समतेवर आधारित, न्यायपूर्ण आणि सुसंस्कृत समाजाची निर्मिती करण्यासाठी बसवेश्वरांचे विचार मार्गदर्शक ठरतील. त्यांच्या कार्याची आणि विचारांची प्रेरणा घेऊन आपण एक समताधिष्ठित, मानवतावादी आणि प्रगत समाज निर्माण करण्यासाठी कटिबद्ध राहूया, हेच त्यांच्या जयंतीनिमित्त खरे अभिवादन ठरेल.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल – bagate.rajendra5@gmail.com**

# जि. प. प्राथमिक शाळा भिमनगर स्पेशल नळदुर्ग येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती विविध उपक्रमांनी साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस. के. गायकवाड) : विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा स्पेशल नळदुर्ग भिमनगर येथे आभिवादनाच्या कार्यक्रम आयोजित करून विविध उपक्रमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली.



प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी शालेय विद्यार्थ्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर इंग्रजी व मराठी भाषेतून भाषणे केली. महामानवाच्या जयंतीचे औचित्य साधून नळदुर्ग येथील बौद्धाचार्य तथा संपादक दादासाहेब बनसोडे यांनी मार्गदर्शन केले.तसेच शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय शेख सरांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्यासाठी योग्य दिशेने कशी वाटचाल करावी हे सांगितले.

तर येथील सहशिक्षिका श्रीमती टिळक सुलक्षणा मॅडम यांनी मुलांसाठी शालेय वस्तूमध्ये एक रजिस्टर, एक पेन, एक चित्रकला वही, कंपास बॉक्स, इंग्रजी रिडर वाटप केले तसेच चिवडा लाडू पेढे खाऊचे वाटप केले.

शाळेत मुख्यमंत्री योजनेतील माजी प्रशिक्षणार्थी प्रेरणा सुरवसे मॅडम यांनी विद्यार्थ्यांसाठी आणि सर्व उपस्थितांसाठी खीर दान केले व शाळेस डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची एक प्रतिमा भेट दिली.

शाळेतील कार्यरत शिक्षीका टिळक सुलक्षणा मॅडम ह्यांच्या परिवारातील शैलेश शिलवंत,श्वेत शिलवंत शालवी शिलवंत आदी सहकुटुंब शाळेत उपस्थित राहून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली.

# नैताळे येथील घायाळ यांचा प्रामाणिकतेचा आदर्श

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी :



प्रामाणिकपणा आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव जपणाऱ्या एका प्रेरणादायी घटनेने नैताळे परिसरात चर्चेला उधाण आले आहे. येथील विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेत सेवक म्हणून कार्यरत असलेले प्रभाकर घायाळ यांनी रस्त्याच्या कडेला सापडलेला मोबाईल कोणताही स्वार्थ न बाळगता मूळ मालकिणीला परत करत प्रामाणिकतेचा आदर्श घालून दिला आहे. त्यांच्या या कृतीचे समाजमाध्यमांवर तसेच ग्रामस्थांतून मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे.

### सापडलेला मोबाईल परत करत प्रभाकर घायाळ यांचे कौतुक

मिळालेल्या माहितीनुसार, गाजवाडी-नैताळे मार्गावरील सोसायटी परिसरात कामावरून घरी जात असताना प्रभाकर घायाळ यांना एक मोबाईल रस्त्याच्या कडेला सापडला. मोबाईल कोणाचा आहे किंवा त्याची किंमत किती आहे, याची कोणतीही माहिती नसतानाही त्यांनी तो सुरक्षित ठेवत मालकाचा शोध घेण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, काही वेळानंतर त्या मोबाईलवर दुसऱ्या क्रमांकावरून कॉल आला. कॉल स्वीकारल्यानंतर समोरून माझा मोबाईल हरवला आहे अशी माहिती देण्यात आली. त्यावर प्रभाकर घायाळ यांनी शांतपणे आपला परिचय देत संबंधित व्यक्तीस मी घरी आहे, आपण येऊन मोबाईल घेऊन जावा, असे सांगितले. त्यानंतर गाजरवाडी येथील प्रगतशील शेतकरी रामनाथ सालके यांची मुलगी स्नेहल हिचा तो मोबाईल असल्याचे स्पष्ट झाले. स्नेहल ही अभियांत्रिकी शिक्षण घेत असून, ती स्कुटीवरून प्रवास करत असताना डिकीतून मोबाईल पडल्याने तो हरवला होता. मोबाईल हरवल्याचे लक्षात आल्यानंतर तिने दुसऱ्या मोबाईलवरून संपर्क साधला आणि अखेर तिचा मोबाईल सुरक्षित असल्याची खात्री झाली.

यानंतर स्नेहल हिने प्रत्यक्ष प्रभाकर घायाळ यांची भेट घेऊन मोबाईल ताब्यात घेतला. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल तिने मनःपूर्वक आभार व्यक्त केले. कोणत्याही प्रकारचा मोह न बाळगता केवळ प्रामाणिक भावनेतून त्यांनी केलेली ही कृती सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

ही घटना समाजमाध्यमांवर प्रसारित होताच गावकऱ्यांनी प्रभाकर घायाळ यांचे अभिनंदन केले. त्यांच्या या कृतीमुळे समाजात प्रामाणिकपणाचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे. दरम्यान, या घटनेतून विद्यार्थ्यांनी आणि प्रवास करणाऱ्या नागरिकांनी आपल्या मौल्यवान वस्तूंची काळजी घेणे आवश्यक असल्याचा संदेशही मिळतो. अशा वस्तू मिळवण्यासाठी पालकांना मोठे कष्ट करावे लागतात, त्यामुळे जागरूकता अत्यंत गरजेची आहे. आजच्या काळात केवळ बाह्य आचरणापेक्षा प्रामाणिक वर्तन अधिक महत्त्वाचे ठरते, हे प्रभाकर घायाळ यांच्या कृतीतून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

# जवळे दुमाला येथे अभिनव पद्धतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव : प्रतिनिधी, सुधाकर रणदिवे,जवळे दुमाला येथे दिनांक १५ एप्रिल रोजी, गावकऱ्यांनी एकमताने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणात अभिवादन करून संपन्न केली.

जयंतीच्या निमित्ताने मराठवाडा जनता विकास परिषद ची शाखा, जवळे दुमाला येथे स्थापन करण्यात आली , मराठवाड्याच्या ग्रामीण भागातील पहिली शाखा, अध्यक्ष प्राचार्य डॉक्टर सोमनाथजी रोडे सर यांच्या हस्ते स्थापन करून, शाखेची अधिकृत घोषणा डॉ.रोडे यांनी केली.

प्रा.अर्जुन जाधव लिखित शोधयात्रा सत्याची या ग्रंथाचे विमोचन प्रसिद्ध लेखक प्राचार्य गौतमजी गायकवाड व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध सत्कार करण्यात आले. प्रा.अर्जुन जाधव जेव्हा गावी येतात तेव्हा, पहिली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिकवतात, अशा विद्यार्थ्यांचा सत्कार डॉ. गोविंदराव कोकणे सर यांच्या हस्ते करण्यात आला. गावातील आजी-माजी सैनिक यांचे सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

गावात पहाटे पाच वाजता रामभक्त नागरीक हरीभजन म्हणत रामफेरी करतात, या रामभक्तांचा सत्कार डॉ.रोडे यांच्या हस्ते करण्यात आला.

गावातील सेवाभावी नागरिक, श्री सोपान वडगणे यांनी ग्रामीण रुग्णालयास जागा दिल्याबद्दल त्यांचा सत्कार, श्री विजय वडगणे यांनी स्विकारला, तसेच आयु सुखदेव वाघमारे यांचाही सत्कार करण्यात आला.

यांप्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उप परिसर धाराशिव येथील इंग्रजी विभागाचे प्रा.डॉ. गोविंदराव कोकणे यांनी महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मैत्री या विषयावर अभ्यासपूर्ण विचार मांडले.




प्राचार्य गौतमराव गायकवाड यांनी प्रा. अर्जुन जाधव यांच्या विविध लेखनावर भाष्य करून शोधयात्रा सत्याची या ग्रंथाची थोडक्यात समीक्षा केली.

प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे यांच्या हस्ते जवळे दुमाला येथील नूतन सरपंच श्री मनोज (बापू )जाधव यांचा सत्कार करण्यात आला. गावकऱ्यांनी राळेगणसिद्धी, हिवरे बाजार या गावाप्रमाणे एकजुटीने प्रयत्न केल्यास या गावचा नक्कीच काय पालट होईल असे डॉ रोडे म्हणाले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीधर काळे, भागवतराव साळुंखे, भगवान जाधव ,खंडू जाधव , सुनील जाधव, लखन वाघमरे,विजय वडगणे, अजमेर मुलांनी, सागर जाधव, सरपंच मनोज जाधव,पांडुरंग गायकवाड, बाबा शेख, इत्यादींनी प्रयत्न केले.

शेवटी मराठवाडा जनता विकास परिषद जवळे (दुमाला ) शाखेचे अध्यक्ष प्रकाश सोनार यांनी सर्वांचे आभार मानले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सोलापूर जिल्ह्यात १५९० रुग्णांना सुमारे १२.८६ कोटीची मदत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती; २० गंभीर आजारासाठी मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. सोलापूर जिल्ह्यात आर्थिक वर्षात १५९० रुग्णांना सुमारे १२ कोटी ८६ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

**२० गंभीर आजारासाठी मदत**

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

**सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

**आर्थिक वर्षातील मदत**

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील १५९० रुग्णांना सुमारे १२ कोटी ८६ लाख ६ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही रुग्णाचा उपचार थांबू नये, यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. या प्रयत्नांमुळे सोलापूर जिल्ह्यातील अनेक गरजू व पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे. गरजू रुग्णांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी तसेच अधिक माहितीसाठी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता ही सामाजिक परिवर्तनाची क्रांतिकारी चळवळ : भैरवनाथ कानडे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पत्रकारितेला केवळ बातमी देण्याचे माध्यम न ठेवता ती सामाजिक न्याय, समता आणि परिवर्तनाची प्रभावी चळवळ बनवली. 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत' आणि 'जनता' यांसारख्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून त्यांनी वंचित समाजाचा आवाज बुलंद केला आणि विचारांची क्रांती घडवून आणली, असे प्रतिपादन शिक्षक तथा प्रेरणादायी वक्ते भैरवनाथ कानडे यांनी केले.

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, ता.तुळजापूर यांच्या वतीने आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पत्रकारितेतील योगदान या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अरुण लोखंडे होते. तर प्रमुख पाहुणे व सत्कारमूर्ती म्हणून पंचायत समिती सदस्य ड. आशिष गणेश सोनटक्के आणि परिवर्तन सामाजिक संस्थेचे संस्थापक मारुती बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पंचायत समितीचे नूतन सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल ड. आशिष गणेश सोनटक्के यांचा सत्कार करण्यात आला. तसेच महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने महात्मा गांधी व्यसनमुक्ती पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल मारुती बनसोडे यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तर युवा कार्यकर्ते प्रविण जाधव यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या वेळी ड. आशिष सोनटक्के, मारुती बनसोडे व अरुण लोखंडे यांनीही आपले उद्बोधक विचार व्यक्त करत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे समाजातील महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार संघाचे एस.के. गायकवाड यांनी केले.

या कार्यक्रमास पत्रकार,किशोर धुमाळ, विजय पिसे, इरफान काझी, संजय पिसे, शामकांत नागीले, विठ्ठल सोनटक्के,सामाजिक कार्यकर्ते काशिनाथ सोमोसे,नामदेव यादव,आरविद लोखंडे, जिवन गुळे सह नागरिक उपस्थित होते.

# भिमप्रेरणा सामाजिक संस्था यांच्यावतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त पाणी व लाडू वाटप कार्यक्रम संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज ; भिमप्रेरणा सामाजिक संस्था यांच्या वतीने भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त विक्रोळी पार्कसाईट याठिकाणी पाणी व लाडू वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष तथा संस्थापक योगेश शिंदे यांनी केले होते.तसेच या कार्यक्रमाला एसीपी प्राची विनायक कर्णे तसेच वरिष्ठ पोलिस निरीक्षक संतोष घाटेकर यांनी भेट दिली.यावेळी त्यांनी संस्थेने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे कौतुक करत पुढे देखील तुम्ही असे चांगले उपक्रम राबवत राहा असे संस्थेचे पाधिकारी यांना मार्गदर्शन करत,संस्थेच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष सुगत साळवे,महादेव ढीवरे,प्रमोद कांबळे,रोहित सावंत,महेंद्र दानाने,सुभाष कांबळे,सिद्धेश घोरपडे,सुनिल कांबळे,सुनिल मोहिते,तेजस दळवी,सुमित गमरे आदि संस्थेचे कार्यकर्ते तसेच पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तथागत कला व क्रीडा सांस्कृतिक तरुण मंडळातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरामध्ये स्वामी विवेकानंद चौकामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे १३५ जयंती मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात आली याप्रसंगी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष श्री राजेंद्र कोरके पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना कोरके पाटील यांनी सुरुवातीला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या व ते पुढे बोलताना म्हणाले की डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार असून, त्यांनी अथक परिश्रम घेऊन जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना तयार केली. असे त्यांनी उद्गार काढले. यावेळी मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले यामध्ये ७५ व्यक्तींनी रक्तदान केले. प्रत्येक रक्तदात्याला मंडळाच्या वतीने एक पाण्याचा जार देण्यात आला.

यावेळी उपस्थित मला वाहतूक अध्यक्ष, दिलीप तात्या फडतरे, उपाध्यक्ष बलराज शिकलकर, दिनेश सगरे, राजू पवार, बाळासाहेब सगरे, शकील पटवगिरी, सोमा पवार, मुजावर, सुरज विभुते, विजू बिराजदार, खजिनदार अविनाश वाघमारे, तसेच मंडळाचे सदस्य आतिश वाघमारे ,हर्षवर्धन वाघमारे, महादेव वाघमारे ,विश्वनाथ भंडारे कुमार, वाघमारे रुपेश वाघमारे नरेंद्र खरवडे, कोंडीबा वाघमारे अण्णा वाघमारे कृष्णा कवडे, अंकुश शेळके, अजय पालसांडे, इत्यादी उपस्थित होते.



# सासवड येथे महामानव डॉ. बाबासाहेबांना अभिवादन; विविध क्षेत्रांतील मान्यवरांना पुरस्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती सासवड येथील डॉ. बाबासाहेव आंबेडकर उद्यानात मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. पुरंदर तालुका बहुजन महापुरुष संयुक्त जयंती महोत्सव समितीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे दिवसभर आयोजन करण्यात आले होते. येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्यास अनेक मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

समितीचे ॲड. सुनील धिवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या प्रबोधन सभेस माजी आमदार संजय जगताप, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजय कोलते, जालिंदर कामठे,जिल्हा परिषद सदस्य हरिभाऊ लोळे , नीरा कृषि उत्पन्न बाजार समिती सभापती संदीप भाऊ फडतरे,तसेच साहित्य परिषद अध्यक्ष ॲड. दिलीप निरगुडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. समितीचे विष्णुदादा भोसले यांनी प्रास्तविक केले, तर कैलास धिवार यांनी सूत्रसंचालन केले.

गुरुकुल अॅकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या वेशभूषा सादर करून वाहवा मिळवली.माजी आमदार संजय जगताप यांनी आपल्या भाषणात लवकरच सभागृह उभारले जाईल, व पूर्णकृती पुतळ्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील, अशे सांगितले.

माजी जि. प. अध्यक्ष विजय दादा कोलते, जालिंदर भाऊ कामठे,पोलिस निरीक्षक कुमार कदम यांनी मनोगतातून उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. मुख्य तक्ते प्रबुद्ध साठे यांनी डॉ. बाबासाहेब यांच्या अनेक विचारांचा, कृतींचा जागर करून त्यांना अभिवादन केले. आनंदराव घोरपडे, सी. एम. यादव, शैलेश धिवार, विजय कांबळे, अविनाश जगताप, आबासाहेब वाघमारे, भाऊसौ सोनवणे यांना या प्रसंगी विविध क्षेत्रांतील कामाबद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

नगरसेवक बंडू राऊत, माऊली गिरमे, बाळासाहेब भिंताडे, शिवसेना तालुका प्रमुख अभिजित जगताप, दत्ता कड, डॉ. संजय रावळ, डॉ. सुरेश कोडीतकर, सीमा साळवे, संदीप टिळेकर, शोभा जमदाडे, संजीवनी गायकवाड, रवी फुले, धनंजय साबळे, शैलेश धिवार, मोहन चव्हाण, प्रा उषा टिळेकर,संदीप टिळेकर, प्रणाली जमदाडे, अर्चना कुंभार, जयश्री शिंदे, राजाराम बेंगळे, केशव काकडे, प्रा सुनील रणपिसे, महादेव बापू रणपिसे यांसह मोठ्या संख्येने सासवडकर नागरिक उपस्थित होते सुनील धिवार, सोपान रणपिसे, राहुल गायकवाड, कैलास धिवार, बळीराम सोनवणे, सुहास बेंगाळे, डॉ.विनायक गायकवाड, सुनील जगताप, सचिन कांबळे यांसह कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

## कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात करिअर मार्गदर्शन कार्यशाळा

# विद्यार्थ्यांनी अंगभूत कौशल्य विकसित करणारे शिक्षण घ्यावे : शांभवी कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : विद्यार्थ्यांनी दहावीनंतर आयुष्याची दिशा ठरविण्यासाठी स्वतःची आवड, क्षमता आणि भविष्याचा विचार करून विज्ञान, वाणिज्य आणि कला शाखांमधून आपला मार्ग निवडला पाहिजे तसेच त्या जोडीला अंगभूत कौशल्य विकसित करणाऱ्या कोर्सेसचे ज्ञान घेतले पाहिजे असे प्रतिपादन शांभवीताई कल्याणशेट्टी यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयाने आयोजित केलेल्या दोन दिवशीय कार्यशाळेचा शुभारंभ करताना त्या बोलत होत्या. व्यासपीठावर संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, ज्युनिअर विभाग प्रमुख





पूनम कोकळगी, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, विवेकानंद प्रतिष्ठानचे सदस्य गुरुपादप्पा आळगी उपस्थित होते.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, विज्ञान शाखा घेतल्यास डॉक्टर, इंजिनियर, संशोधक बनता येते. मात्र या शाखेसाठी मेहनत आणि सातत्य आवश्यक असते.

वाणिज्य शाखा निवडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अकाउंटिंग, बँकिंग, चार्टर्ड अकाउंट कंपनी सेक्रेटरी, बिझनेस मॅनेजमेंट यांसारखे अभ्यासक्रम पूर्ण करून विद्यार्थी आर्थिक क्षेत्रात आपले स्थान निर्माण करू शकतो.

कला शाखेच्या विद्यार्थ्यांना समाजशास्त्र, इतिहास, राजकारण, भाषा आदीचा अभ्यास करून अधिकारी, शिक्षक, पत्रकार, लेखक, अशा क्षेत्रात करिअर करता येते. त्यासाठी विचारशक्ती, लेखनकौशल्य आवश्यक असते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुनम कोकळगी यांनी केले, सूत्रसंचलन शिवकुमार मठदेवरु यांनी केले आभार प्रा सलोनी शहा यांनी मानले.

यशस्वीतेसाठी प्राध्यापिका हर्षदा गायकवाड, शितल टिंगरे, मधुबाला लोणारी, शितल फुटाणे, सौरभ भस्मे, गुरूसिध्द हपाळे यांनी प्रयत्न केले.

**कौशल्याभिमुख शिक्षणातून रोजगाराची संधी**

दहावीनंतर डिप्लोमा, आयटीआय आणि कौशल्याभिमुख कोर्सेसद्वारेही विद्यार्थी लवकर नोकरी मिळवू शकतात. इलेक्ट्रिशियन, मेकॅनिक, संगणक ऑपरेटर अशा क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण घेऊन स्वतःचा व्यवसायही सुरू करता येतो असे मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

# भंडीशेगाव व रोपळे मंडळात १६०६ दाखले सेवांचे वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर महसूल विभागाशी संबंधित नागरिकांची प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी महसूल विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे राबविण्यात येत आहे. या अभियानातंर्गत आज दिनांक १७ रोजी पंढरपूर तालुक्यातील भंडीशेगाव व रोपळे या मंडळातून १६०६ विविध सेवा व विविध दाखले देण्यात आले असल्याची माहिती तहसीलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

**तहसीलदार लंगुटे; छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातून नागरिकांचे समाधान**

या अभियानातंर्गत भंडीशेगाव व रोपळे येथील शिबिरात निकाली काढण्यात आलेले फेरफार १४०, सातबारा मधील दुरुस्ती १८, डिजिटल सातबारा २९२, ८ अ उतारे २५७, विविध दाखले ६४६, एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत निकालात काढण्यात आलेले अर्ज १७, भूसंपादन प्रकरणी कमी-जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्यावत करण्यात आलेली प्रकरणे ०६, सामाजिक योजना २, शिधापत्रिका ५२, कृषी यांत्रिकीकरण, फलोत्पादन व कृषी सिंचन योजना ६०, आभा कार्ड एच.बी, तपासणी व औषधोपचार १५, ई- मोजणी फेरफार नकाशा १५,आदी सेवा व दाखले देण्यात आले. यामध्ये भंडीशेगाव मंडळातून ९३६ तर करकंब मंडळातून ६७० असे एकूण १६०६ विविध सुविधा एकाच छताखाली पुरवण्यात आल्याचे तहसीलदार सचिन लंगुटे यांनी सांगितले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसिलदार सचिन लंगुटे होते.यावेळी जि.प. सदस्य मयुरी बागल, पं.स. सदस्य निखीलगिर गोसावी, प्रमिला झांबरे, विजया भोसले, महादेव जाधव, धाराशिव शगुरचे कार्यकारी संचालक अमर पाटील, जनक भोसले, सरपंच सुमन यलमार, निवासी नायब तहसिलदार बालाजी पुदलवाड, महसूल नायब तहसिलदार दीपक शिंदे, सहा. महसूल अधिकारी दादा गावंदरे, मंडल अधिकारी दिनेश भडंगे, बाळासाहेब कदम आदीसह तलाठी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# श्रीमंत मालोजीराजे भोसले यांचा संकल्प; आध्यात्मिक वारशाचे होणार संवर्धन

## अक्कलकोटमध्ये 'अनुभूती प्रकल्पा'चा भूमिपूजन सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/कमलाकर सोनकांबळे : श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पावन भूमीत, हत्ती तलावासमोरील नियोजित स्थळी अनुभूती प्रकल्पा'चा भूमिपूजन व पायाभरणी सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडला.हा प्रकल्प भविष्यात आध्यात्मिक आणि सांस्कृतिक केंद्र म्हणून नावारूपास येईल,असा विश्वास अक्कलकोट संस्थानचे श्रीमंत मालोजीराजे तिसरे संयुक्ताराजे भोसले(राजासाहेब) यांनी व्यक्त केले.

या मंगल सोहळ्याचे मुख्य विधी क्षेत्र रामेश्वरम येथील श्रीविद्या साधक परमपूज्य श्री राधाकृष्ण गंगाधर दशपुत्रे (अंबुजानंदनाथ)यांच्या हस्ते शास्त्रोक्त पद्धतीने पार पडले.याप्रसंगी अक्कलकोट श्री स्वामी समर्थ समाधी मठातील चोळप्पा महाराजांचे वंशज आण्णू महाराज आणि मि.नि.प्र.बसवलिंग महास्वामी (विरक्त मठ) यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच मोठ्या संख्येने भाविक, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि ट्रस्टचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

> **अक्कलकोट राजघराणे छत्री ट्रस्टतर्फे हा प्रकल्प अत्यंत निष्ठेने पूर्ण केला जाणार असूनअनुभूती प्रकल्पाच्या माध्यमातून अक्कलकोटचा समृद्ध आध्यात्मिक वारसा जपण्याचा आणि त्याचे संवर्धन करण्याचा आमचा मानस आहे.हे अनुभूती केंद्र केवळ एक वास्तू नसून भाविकांसाठी प्रेरणादायी ठरेल.**
>
> **– श्रीमंत मालोजीराजे तिसरे संयुक्ताराजे भोसले (राजासाहेब) अक्कलकोट**

अक्कलकोट संस्थानचे श्रीमंत मालोजीराजे तिसरे यांनी या प्रकल्पाविषयी माहिती देताना सांगितले की, 'अनुभूती प्रकल्पा'च्या माध्यमातून अक्कलकोटचा समृद्ध आध्यात्मिक वारसा जपण्याचा आणि त्याचे संवर्धन करण्याचा मानस आहे.श्री अक्कलकोट राजघराणे छत्री ट्रस्टतर्फे हा प्रकल्प अत्यंत निष्ठेने आणि उच्च दर्जाचे निकष राखून पूर्ण करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

पुणे येथील 'मोनार्क प्रा.लि.यांची तांत्रिक मार्गदर्शक आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.या प्रकल्पाचे नियोजन वास्तुविशारद महेश नामपूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.



कार्यक्रमाचा शेवट सामूहिक प्रार्थनेने झाला.अनुभूती प्रकल्प' हे केवळ एक वास्तू नसून ते भाविकांसाठी प्रेरणादायी आणि आदर्श आध्यात्मिक केंद्र ठरेल,असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## पंढरपूर तालुका पोलिसांची अवैध दारू विरुद्ध कारवाई, एकूण २२,७०० चा अवैध दारू साठा जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील आगामी सहन उत्सव च्या अनुषंगाने पंढरपूर तालुका पोलिसांनी माननीय पोलीस अधीक्षक श्री प्रशांत डगळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे रोपळे, तुंगत ,गोपाळपूर, देगाव, कासेगाव, या ठिकाणी कारवाई करून देशी-विदेशी कंपनीच्या दारूच्या बाटल्या त्यामध्ये वेगवेगळ्या कंपनीच्या एकूण २२००० ,७०० रुपयाचे अवैध दारू साठा पोलिसांनी जप्त केलेला असून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे.



पाच आरोपी वृद्ध मुंबई दारूबंदी कायदा कलम ६५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे सदर ही कारवाई माननीय पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी साहेब माननीय अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम यावलकर साहेब माननीय साहेब पोलीस अधीक्षक श्री प्रशांत डगळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर एपीआय श्री शहाजी गोसावी एपीआय श्री सोनवणे साहेब पीएसआय विक्रम वडणे पोलीस हवलदार सुभाष देशमुख सागर गवळी विजयकुमार आवटी चालक पोलीस कॉन्स्टेबल गोडसे यांच्या पथकाने केली आहे.

## कुंभार वस्ती येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मोहा प्रतिनिधी/प्रविण कसबे : कळंब तालुक्यातील कुंभार वस्ती येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रारंभी बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन ऑल इंडिया पँथरसेनेचे जिल्हाध्यक्ष व जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अशोक कसबे बाबा कसबे, गणेश कसबे,रतन गायकवाड, अरविंद हिरवे यांच्या हस्ते करण्यात आले.

तसेच निळ्या झेंड्याचे ध्वजारोहण भारत कसबे, अभिजित कसबे, समाधान पायाळ व फकीर कसबे यांच्या हस्ते करण्यात आले.

व सामुहिक बुद्ध वंदना घेऊन बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीचे संचालक प्रविण कसबे, विद्युत वितरण कंपनीचे निवृत्त लाईनमन मुकूंद कुंभार, भगवान कसबे, शिद्धु नाना कसबे, दिलीप कसबे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच ग्रामपंचायत कार्यालय मोहा येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी ग्रामपंचायत उपसरपंच बशारत मोमिन, ग्रामपंचायत सदस्य अनिल मडके, आत्माराम लकडे, रणजित मडके, तसेच व्होके, कोकाटे, पाटील यांची उपस्थिती होती.

## श्री संत तुकाराम महाराजांच्या नवीन चांदीच्या पालखीत संकल्पनेत श्री विठ्ठल रुक्मिणी नित्य दर्शन भक्तगणांचा सहभाग




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री संत तुकाराम महाराजांच्या नवीन चांदीचे पालखी रथ संकल्पनेत श्री विठ्ठल रुक्मिणी नित्य दर्शन भक्तगणांनी लोकसभा व लोकवर्गणीतून श्री संत तुकाराम महाराज यांच्या चांदीचा पालखी रथाच्या संकल्पनेमध्ये सहभागी होण्याचे भाग्य व या सुवर्ण क्षणाचे साक्षीदार होण्याचे भाग्य हे पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी नित्य दर्शन भक्तगण यांना मिळणार आहे श्री विठ्ठल रुक्मिणी नित्य दर्शन भक्तगण यांनी सर्वांनी मिळून हे शक्ती सहभाग घेत देणेही स्वरूपात पंचवीस हजार एक, रुपये जमून रविवार दिनांक १२ ४ २०२६ रोजी श्री क्षेत्र देहू येथे जाऊन श्री संत तुकाराम महाराजांचा संस्थान श्री क्षेत्र देहू येथे संस्थेचे प्रमुख श्री गणेश जी मोरे महाराज विश्वस्त यांच्याकडे रोख रक्कम पंचवीस हजार एक, प्रदान करण्यात आली.

या सुवर्ण क्षणाचे साक्षीदार होण्याचे भाग्य व हा उपक्रम राबवण्यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी नित्य दर्शन भक्तगण पंढरपूर अनमोल सहकार्य व सुवर्ण क्षणाचे साक्षीदार होण्याचे भाग्य लाभले व सर्वांच्या सहकार्याने हा उपक्रम पार पडला.

## अवैध उत्खनन रोखताना ताण; तोडगा काढण्याची महाराष्ट्र राज्य तलाठी संघ शाखा भिवंडी यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यात गौण खनिजाच्या संरक्षण व कारवाईदरम्यान महसूल कर्मचाऱ्यांवर वाढत असलेला ताण आणि त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनल्याने यावर तातडीने धोरणात्मक तोडगा काढावा, अशी मागणी भिवंडी तलाठी संघटनेने तहसीलदार अभिजीत खोले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. महसूल विभागाकडे गौण खनिजाचे संरक्षण, उत्खनन व वाहतूक नियंत्रण, तसेच दंडात्मक कारवाईची जबाबदारी सोपविली असली, तरी कारवाईच्या वेळी केवळ ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकाऱ्यांनाच जबाबदार धरले जाते. सरकारच्या नियमानुसार ही जबाबदारी महसूल, पोलिस व परिवहन विभागाची संयुक्त असताना प्रत्यक्षात समन्वयाचा अभाव असल्याची खंत संघटनेने व्यक्त केली आहे. महसूल कर्मचाऱ्यांकडे निवडणूक काम काज, नैसर्गिक आपत्ती सर्वेक्षण, मदत वाटप, विविध अभियान, शासकीय योजना, राजशिष्टाचार, फेरफार, वसुली अशा अनेक जबाबदाऱ्या असताना अवैध गौण खनिज उत्खननावर प्रभावी नियंत्रण ठेवणे मानवी मर्यादेबाहेर जात असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. त्यातच रेतीमाफियांविरोधात कारवाई करताना कर्मचाऱ्यांना जीव धोक्यात घालावा लागतो. पोलिस संरक्षण केवळ कागदावरच असल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे. सरकारच्या वाळू धोरणानुसार संयुक्त पथकाद्वारे कारवाई प्रभावीपणे राबवावी, कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. केवणी व काल्हेर रेतीबंदरावर सध्या ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकाऱ्यांची नियुक्ती करून दिवस-रात्र गस्त ठेवली जात आहे. मात्र, प्रत्यक्षात पोलिस कर्मचारी वेळेवर हजर



राहत नसल्याने पथकातील कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. महिला कर्मचाऱ्यांना रात्री उशिरापर्यंत कोणत्याही पोलिस बंदोबस्ताशिवाय काम करावे लागते. अवैध उत्खननाविरोधात कारवाई करताना कर्मचाऱ्यांना स्वतःचे वाहन वापरावे लागते, जेसीबीचा खर्च स्वतः करावा लागतो, यामुळे आर्थिक व मानसिक शोषण होत असल्याचे संघटनेने नमूद केले आहे. काही दिवसांपूर्वी जप्त केलेल्या साहित्याच्या प्रकरणातही दक्षता पथकाने योग्य समन्वय न ठेवल्याचा दावा करण्यात आला आहे.

### २५ गावांचा उत्स्फूर्त सहभाग; मिरवणूक, प्रबोधन आणि सामाजिक ऐक्याचा संदेश

## पडघ्यात महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्साहात साजरी






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी /मिलिंद जाधव :

भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त भव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. मंगळवार, दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या या उत्सवात पडघा परिसरातील तब्बल २५ गावांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामाजिक ऐक्याचे दर्शन घडविले. पडघा येथील जिल्हा परिषद मराठी केंद्र शाळेत सकाळी १०.३० वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शिवसेना नेते प्रकाश पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महामानवांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. तसेच मान्यवरांचे स्वागत महामानवांच्या विचारांचे पुस्तक देऊन करण्यात आले. प्रबोधन सत्रात शाहीर आकाश पवार यांनी आम्ही भारताचे लोक आणि भारतीय संविधान या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांनी संविधानाचे महत्त्व साध्या आणि सोप्या भाषेत मांडत नागरिकांना आपल्या अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव करून दिली. सायंकाळी ७ वाजता समतानगर बुद्ध विहार येथून जिल्हा परिषद मराठी शाळा, पडघा पर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमा विद्युत रोषणाई व फुलांनी सजवलेल्या रथावर विराजमान करण्यात आल्या होत्या. जयघोष, फटाक्यांची आतषबाजी आणि उत्साहपूर्ण वातावरणात मिरवणूक पार पडली. पडघा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांनी प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून मिरवणुकीचे उद्घाटन केले.

मिरवणुकीत पडघा विभागातील विविध क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. ठिकठिकाणी स्थानिक नागरिकांकडून सरबत, अल्पोपहार व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच पडघा येथील ब्रीड्स ब्रेकर्स डान्स स्टुडिओच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याने प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या निमित्ताने पडघा येथील प्रवेशद्वारांवर भव्य स्वागत कमानी उभारण्यात आल्या होत्या. तसेच महात्मा फुले, डॉ. आंबेडकर आणि भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचा आकर्षक देखावा उभारण्यात आला होता. या संयुक्त जयंती उत्सवाच्या माध्यमातून महापुरुषांच्या विचारांचा प्रसार आणि सामाजिक ऐक्य वृद्धिंगत करण्याचा उद्देश आयोजकांनी व्यक्त केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पडघा विभागातील तरुणांनी विशेष मेहनत घेतली. सूत्रसंचालन गणेश गायकवाड यांनी केले, तर स्थानिक नागरिकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## तरुण भारत माजी कर्मचारी समितीतर्फे मोकाशी, देशपांडे, जोशी यांचा सत्कार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : तरुण भारत माजी कर्मचारी समितीतर्फे बुधवार दिनांक १५ एप्रिल रोजी माजी उपसंपादिका व ज्येष्ठ पत्रकार सौ. मानसीताई मोकाशी यांचा अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सत्कार करण्यात आला. तसेच तरुण भारत संवादचे निवासी संपादक विजयकुमार देशपांडे यांना देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेतर्फे ल.गो. काकडे पत्रकार पुरस्कार मिळाल्याबद्दल आणि श्याम जोशी यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार श्री.अरविंद जोशी, श्री.नारायण कारंजकर, श्री.अनिल कुलकर्णी,नगरसेवक ज्ञानेश्वर मॅकल, सर्वश्री दशरथ वडतिले, दिलीप कुलकर्णी, माधवराव मोकाशी, सतीश पाटील, श्री. व सौ. आराध्ये, श्री. व सौ. बसाटे,श्री. व सौ. खमितकर,श्री. व सौ. शाबादे उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील आराध्ये तर प्रास्ताविक दशरथ वडतिले यांनी केले.